# विश्वकर्मा विद्यापीठ आणि डिफेन्स एरोस्पेसमध्ये करार

**पुणे** : विश्वकर्मा विद्यापीठाचा (व्हीयू) जे. कुमार डिफेन्स अँड एरोस्पेस प्रा. लि. या कंपनीसोबत संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रातील सल्लागारिता, संशोधन, व प्रशिक्षण यासाठी सामंजस्य करार होणार आहे. हा औपचारिक करार उद्या दि. १७ रोजी विद्यापीठाच्या परिसरात होणार आहे. या भागीदारीचा उद्देश शिक्षण क्षेत्र आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करून विद्यार्थ्यांना प्रकल्पांद्वारे प्रत्यक्ष अनुभव मिळवून देणे आहे. शिवाय या माध्यामातून प्राध्यापकांना उद्योगासमोरील आव्हानांवर काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या कराराअंतर्गत, जे. कुमार डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी संरक्षण मंत्रालयासाठी प्रशिक्षण आणि जनजागृती सत्रांचे आयोजन करेल, तसेच विद्यापीठाला सल्लागारिता प्रकल्पही देईल. या भागीदारीबाबत बोलताना विश्वकर्मा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे म्हणाले, जागतिक स्तरावर शिक्षणप्रणालीमध्ये मोठे बदल होत आहेत. उद्योगांशी भागीदारी करून त्यांच्या समस्या सोडवणे हे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळविण्यास आणि शैक्षणिक जीवनातच प्रत्यक्ष अनुभव देण्यास सहाय्यक ठरते. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध प्रकल्पांवर काम करण्याची आणि प्राध्यापकांना उद्योगातील विशिष्ट आव्हानांशी जोडले जाण्याची संधी प्राप्त झाली आहे.